|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**प्रवेश पात्रता विभाग**

परिपत्रक क्र. ३४/ २०२५

प्रति,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये यांचे प्राचार्य
आणि मान्यता प्राप्त परिसंस्था / स्वायत्त परिसंस्था यांचे संचालक
आणि विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा यांचे संचालक यांना..

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद ( AICTE ) अंतर्गत **बी.बी.ए, बी.बी.ए (आय.बी ), बी.एम.एस., एम.बी.ए ( इंटिग्रेटेड) व बी.सी.ए., एम.सी.ए. (इंटिग्रेटेड)** अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चितीबाबत.

**संदर्भ:-** १.मा.सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.बैठक -२०२५/प्र.क्र.४१/ तांशि-४, दि.२०.०५.२०२५.

२.मा.संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी / विकाप/२०२४-२५ / १४७, दि.१०.०३.२०२५.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयांस अनुसरुन वरील संदर्भीय पत्र १ प्राप्त झाले आहे.तत्पुर्वी आपणांस विदितच आहे की, मा.संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भ क्र.२ अन्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये **बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए ( इंटिग्रेटेड) व एम.सी.ए. (इंटिग्रेटेड)** अभ्यासक्रमांच्या संस्थाना आहे त्या स्थितीत ( As and Where) परिषदेच्या अधिपत्याखाली अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये तसेच तदनंतरही **बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए ( इंटिग्रेटेड) व एम.सी.ए. (इंटिग्रेटेड)** अभ्यासक्रमाच्या संस्थांना मान्यता प्रदान केली आहे.तसेच सदरहू अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात येऊन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश प्रक्रिया पार पडलेली आहे.

प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून **बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए ( इंटिग्रेटेड) व एम.सी.ए. ( इंटिग्रेटेड )** हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत आले असून हया अभ्यासक्रमांकरीता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे संक्रमण कालावधी ठेवण्यात आल्याने वरील संदर्भ क्र. २ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संस्थांनी आकारणी करावयाचे शुल्क व अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीबाबत करावयाच्या कार्यवाहीबदद्ल निर्देश देण्यात आले होते.आता नुकतेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद अंतर्गत आलेल्या **बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए ( इंटिग्रेटेड) व एम.सी.ए. (इंटिग्रेटेड)** या अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधीत विद्यापीठाने निश्चित करुन देण्याचे आदेश प्राप्त झाले आहे.

वरील बाब लक्षांत घेऊन, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था आणि विद्यापीठातील शैक्षणिक प्रशाळांमध्ये सुरु असलेले बी.बी.ए, बी.बी.ए (आय.बी ), बी.एम.एस., एम.बी.ए ( इंटिग्रेटेड) व बी.सी.ए., एम.सी.ए. (इंटिग्रेटेड) या अभ्यासक्रमांकरिता खालीलप्रमाणे शुल्क निश्चित करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली आहे.

| अभ्यासक्रमाचे नाव | शिक्षण शुल्क रू. (Tution Fee Rs.) | विकास शुल्क रू. ( Development Fee Rs.) |
|---|---|---|
| B.B.A./ B.B.A (I.B)/B.M.S/ M.B.A (Integrated) | 30000/- @ | 5000/- |
| B.C.A / M.C.A ( Integrated) | 35000/-@ | 5000/- |

@ सदर शुल्क AICTE च्या NORMS ची पुर्तता करण्याच्या अधिन राहून निश्चित करण्यात येत आहे.

तरी वरील प्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

आपला विश्वासू

( डॉ.विनोद प्र.पाटील )
कुलसचिव

जा.क्र.कबचौउमवि/०६/प्रवेश/ ३८ /२०२५, दि.१२/०६/२०२५

**प्रत माहितीसाठी :**१.मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग,जळगांव, २.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, ३.मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि.४.ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि.